पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

कार्यपत्रिका क्रमांक ६

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २८/४/२००९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्रं. ५३**

करआकारणी व करसंकलन खात्याकडील वडगांव बुद्रुक संपर्क कार्यालयाकडील ग्रामपंचायत वडगांव बुद्रुक नमूना नं. ८ अ वरुन सन १९९९–२००० मधील वडगांव बुद्रुक विभागाच्या आकारणी प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/३४ दि. २०/४/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ७ सन २००९–२०१० चा विचारासाठी.

**विषय क्रं. ५४**

करआकारणी व करसंकलन खात्याकडील वडगांवशेरी संपर्क कार्यालयाकडील ग्रामपंचायत वडगांवशेरी नमूना नं. ८ अ वरुन सन १९९९–२००० मधील वडगांवशेरी विभागाच्या आकारणी प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/३५ दि. २०/४/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ८ सन २००९–२०१० चा विचारासाठी.

**विषय क्रं. ५५**

करआकारणी व करसंकलन खात्याकडील धायरी संपर्क कार्यालयाकडील ग्रामपंचायत धायरी नमूना नं. ८ अ वरुन सन १९९९–२००० मधील धायरी विभागाच्या आकारणी प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/३६ दि. २०/४/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ९ सन २००९–२०१० चा विचारासाठी.

**विषय क्रं. ५६**

विकास योजना विभागाच्या खराडी/वडगांवशेरी भागातील सन २००८–०९ मधील विविध ले–आऊट प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/३७ दि. २०/४/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. १० सन २००९–२०१० चा विचारासाठी.

**विषय क्रं. ५७**

करआकारणी व करसंकलन खात्याकडील सन २००७–०८ मधील पेठ पाषाण विभागाच्या आकारणी प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/३८ दि. २०/४/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ११ सन २००९–२०१० चा विचारासाठी.

**विषय क्रं. ५८**

नगर अभियंता खात्याकडील पेठ पाषाण विभागाकडील सन २००७–०८ या सालातील बांधकाम प्रकरणी आकारणी विभागाने भोगवटापत्राशिवाय (Completion Certificate) आकारणी केलेल्या जागांची अे फॉर्मवरुन वसूल करावयाचे जागा वापर तडजोड फी बाबत तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/३९ दि. २०/४/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. १२ सन २००९–२०१० चा विचारासाठी.

Unregistered

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्रं. ५९**

श्री.एरंडे राजेंद्र पुरुषोत्तम यांची विशेष कार्याधिकारी, सांख्यिकी म्हणून दि. १७/३/२००९ पासून ६ महिने मुदतीकरीता र.रुपये २५,०००/– दरमहा एकवट मोबदल्यावर करार पध्दतीने घेण्यात येत असलेली सेवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उका/से/२८ दि. २१/४/२००९ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. ६०**

पं.नेहरु स्टेडियम येथील हॉटेल सारस रेस्टॉरंट, २१ निवासी खोल्या, १ कॉन्फरन्स हॉल लिव्ह ॲण्ड लायसेन्स या तत्वावर दरमहा भाडे र.रुपये १,२९,४१३/– प्रथम वर्षासाठी निर्धारित करुन व त्यानंतर प्रतिवर्षी १२% भाडेवाढ प्रस्तुत करुन ५ वर्षे चालविण्यास देणेकरीता निविदा मागविल्या असता आलेल्या ३ निविदांपैकी सर्वात जास्त रक्कमेची निविदा देणारे श्री.सतिश शेट्टी (विनय केटरर्स) यांना पाच वर्षाकरीता लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर दरमहा र.रुपये २,००,०५३/– प्रथम वर्षी व त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षी १२% भाडेवाढ करुन देण्यास तसेच मा.मुख्य सभा मान्यता देईल त्या दिनांकापासून अगर प्रत्यक्ष ताबा दिनांकापासून त्यांचेबरोबर करार करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(सक)/१५०६ दि. २७/२/२००९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार दि.२६ एप्रिल २००९ नंतर करावा असे दि.१७/३/२००९ च्या सभेत ठरले होते)

**विषय क्रं. ६१**

पुणे शहरातील विविध उद्यानांमध्ये गांडुळखत प्रकल्प राबविणेसाठी निरनिराळ्या संस्था/एजन्सी यांची नेमणूक करुन सदर संस्थेकडून प्रस्तुत प्रकल्प पुढील पाच वर्षासाठी चालविणेसाठी देणे या कामास व खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/घनकचरा/२५ दि. १७/४/२००९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १८/४/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. ६२**

मा.जिल्हाधिकारी यांचेकडून कचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी ताब्यात आलेल्या, ताब्यात येऊ घातलेल्या जागेवर १०० ते १५० मे.टनाचे कंपोस्ट प्रकल्प राबविणेसाठी संस्था/एजन्सी यांची नेमणूक करणे या कामास व खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १८/४/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. ६३**

उरुळी/फुरसुंगी कचरा डेपोतील जुन्या कचऱ्यावर कॅपिंग करणे व अनुषंगिक कामे करणे यासाठी संस्था/एजन्सी यांची नेमणूक करणे या कामास व खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १८/४/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. ६४**

मा.स्थायी समिती ठराव क्र. २८३ दि. २७/५/२००८ सभा क्र. १५ एकात्मिक घनकचरा प्रक्रिया प्रकल्प बी.ओ.ओ.टी. तत्वावर येवलेवाडी येथे राबविणेस पुणे वेस्ट मॅनेजमेंट कंपनी प्रा.लि. यांचेशी करार करणेस मान्यता मिळणेबाबत या विषयाचा फेरविचार करुन मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/घनकचरा/१९ दि. १७/४/२००९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १८/४/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्रं. ६५**

उरुळी देवाची कचरा डेपो विकसित करणे व विविध विकास कामे करणे व सिमाभिंत बांधणे (फेज २) या कामाचे ठेकेदार मे.सदगुरु कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर र.रुपये ८९,५७,३५२=७० हे टेंडर दिडपटीने म्हणजेच र.रुपये १,३४,३६,०२९=०५ पर्यंत ॲटपार दराने काम करुन घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भवन/२१ दि. १७/४/२००९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १८/४/२००९ च्या सभेत ठरले होते.)

Unregistered

**विषय क्रं. ६६**

पुणे मनपाच्या नगर अभियंता खात्याकडील दाखल होणाऱ्या बांधकाम प्रस्तावांच्या छाननीकरीता तयार केलेले Autodcr ह्या संगणक प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी मा.महा.आयुक्त यांच्या पत्रात नमूद केलेल्या एकूण ५०० Digital Signature N code solutions, GNFC उपकंपनी, यांचेकडून र.रुपये ८,२५,०००/- पर्यंत मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम कलम ५.२.२ अन्वये खरेदी करण्याकरीता आणि अनुषंगाने आवश्यक तो करारनामा संबंधितांशी करणेस मान्यता मिळणेबाबत खरेदी करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नअ/८ दि. ९/४/२००९ चे पत्र.

(टिप :- सदर कंपनी ही गुजरात, नर्मदा व्हॅलीफर्टीलायझर या सरकारी कंपनीची उपशाखा आहे.)

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २१/४/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ६७**

पुणे पेठ एरंडवणा फा.प्लॉट नं. ७६अ प्रभाग क्र. २९ लॉ कॉलेज रस्ता, शांतीशिला भागात मनपामार्फत बांधणेत आलेला जिम्नॅशियम हॉल व अभ्यासिका क्षेत्रफळ २४७.७७ चौ.मी. चे मा.नगर उपअभियंता(मुल्यांकन विभागाकडून मासिक भाडे र.रुपये ११,९५९/- प्रथम वर्षासाठी व प्रतिवर्षी २.५% भाडेवाढ निश्चित केल्यानुसार ५ वर्षे कालावधीसाठी सदरची जागा भाडे तत्वावर चालविणेस देणेकामी निविदा मागविल्या असता आलेल्या ३ निविदांपैकी मनपाच्या अपेक्षित रकमेपेक्षा सर्वात जास्त मासिक भाडे र.रुपये १२,१५०/- देऊ करणारे ठेकेदार मे.सोमेश्वर फौंडेशन, स.नं. १९, सोमेश्वरवाडी, पाषाण, पुणे ८ यांची रक्कम स्विकारुन ताबा दिनांकापासून ५ वर्षे कालावधीसाठी भाडे तत्वावर चालविणेस देणेस, मासिक भाडे रकमेत प्रतिवर्षी २.५% भाडेवाढ करणेस, त्याकरीता त्यांचेशी आवश्यक तो करारनामा करणेस तसेच मनपाचे येणारे सर्व कर सदरच्या ठेकेदाराने वेळच्या वेळी भरणेस व ताबा देणेपुर्वी ६ महिन्याचे मासिक भाडे रक्कम अनामत म्हणून व ३ महिन्याचे मासिक भाडे रक्कम आगाऊ स्विकारणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भूजिं)/१४३९ दि. २०/२/२००९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २१/४/२००९ च्या सभेत ठरले होते.)

**सांकिर्ण**

**विषय क्र. ६८**

पुणे, पेठ नाना सि.स.नं. ९३२ येथील ८० फुट डी.पी.रस्त्याने बाधित होत असलेल्या मिळकतीची जागा संदर्भांकित मा.स्थायी समिती ठरावान्वये संपादनाची कार्यवाही मा.विशेष भूमी संपादन अधिकारी क्र. ११, पुणे यांचेमार्फत चालू असून कलम ६ च्या अधिसूचनेवर प्रलंबित आहे. तसेच मिळकतीसाठी टी.डी.आर./ एफ.एस.आय.पोटी मिळणेसाठीचा प्रस्ताव दि. ६/३/२००७ रोजी महापालिकेकडे दाखल झाला आहे. प्रकरणी २/३ रक्कम रुपये ११.४६ कोटी नुकसान भरपाईपोटी मा.भूमि संपादन विशेष अधिकारी क्र. ११ यांजकडेस जमा करण्यात आली आहे.

सदर मिळकत ८० फुट नेहरु रस्त्यात बाधित होत आहे. भूमि आणि जिंदगी कार्यालयाकडून टी.डी.आर./एफ.एस.आय.पोटी दि. २८/३/२००८ रोजी (संयुक्त मोजणी नकाशाबरोबरील विवरणपत्रानुसार १०१.१७ चौ.मी.)/(ताबे यादीप्रमाणे १०१.०० चौ.मी.) क्षेत्राचा ताबा घेण्यात आला असून दि. १२/३/२००९ रोजी मिळकत पत्रिकेवर नोंद झालेली आहे. सदर मिळकतीचे भूसंपादन प्रकरणी सि.स.नं. ९३२ पैकी (संयुक्त मोजणी नकाशाबरोबरील विवरणपत्रानुसार १०१.१७ चौ.मी.)/(ताबे यादीप्रमाणे १०१.०० चौ.मी.) क्षेत्र संयुक्त मोजणीमध्ये नमूद आहे. सदर मिळकतीचा भूसंपादनाचा उद्देश पूर्ण झालेला आहे. त्यानुसार सदर मिळकत भूसंपादन कार्यवाहीतून वगळणेबाबत मा.जिल्हाधिकारी, पुणे यांना कळविण्यात येत आहे. सदर बाब अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/विका/भूप्रा/१४ दि. १७/४/२००९ चे पत्र.

**विषय क्र. ६९**

पुणे, बालेवाडी स.नं. २३/१ क/११ व २३/१क/२ मधून जाणारा १८ मी.डी.पी.रस्तारुंदीने बाधित मिळकतीच्या मूळ मालकाबरोबर आवश्यक तो करारनामा करुन नुकसान भरपाईपोटी र.रुपये २३,१०,०००/- (अक्षरी र.रुपये तेवीस लाख दहा हजार फक्त) अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भूप्रा/१५ दि. १७/४/२००९ चे पत्र.

Unregistered

सुनिल पारखी
उपनगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

UnRegistered

## स्थायी समिती
## दाखल विषय – दि. २८/४/२००९

**विषय क्र. ७०**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८१ मधील तरतूदी अन्वये ॲड्.भाग्यश्री अलाटे यांची पुणे मनपास कायदेविषयक सल्ला व साह्य घेणेकामी दि. २२/४/२००९ पासून सहा महिने मुदतीसाठी महिनेमहा एकवट मोबदला र.रुपये २५,०००/– (र.रुपये पंचवीस हजार) अधिक मोटार कार भत्ता आदा करुन सेवा घेण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(विका क्र.३)/से/३२ दि. २७/४/२००९ चे पत्र.

**विषय क्र. ७१**

मा.शाम देशपांडे व मा.सुनिल बिबवे यांचे दि. २८/४/२००९ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. ६६२ दि. २२/७/२००८ चा फेरविचार करण्यात यावा. (पुणे कोथरुड स.नं. ३० पार्ट याठिकाणी दगडी खाण असून या खाणीमुळे अनारोग्य परिस्थिती झाल्याने सदर दगडी खाणीतील व पोहोच रस्त्याची जागा क्रिडा संकूल व ऑडिटोरिअम इ.कारणांसाठी भूसंपादन कायद्यान्वये किंवा तडजोडीने पुरेशी आर्थिक तरतुद उपलब्ध करुन पुणे मनपाच्या ताब्यात घेण्याबाबत.)

UnRegistered

**सुनिल पारखी**
**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**